जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

संपादकीय

# डाव्या शक्तींसमोरील आव्हान

गेले काही दिवस निवडणुकांच्या बातम्यांनी सर्व वृत्तपत्रे, वाहिन्या ओसंडून वाहत होत्या. त्यातील भाषणे ही एखाद्या साचलेल्या-सडलेल्या पाण्यातून विषारी वायूचे बुडबुडे तडतडावेत तशी भासत आहेत. त्याच पाण्याने आणि मातीने चाललेला हा धुळवडीचा राज्यव्यापी कार्यक्रम असावा, असे वातावरण महाराष्ट्रातील सत्ताधारी आणि त्यांच्या बनावटी विरोधी पक्षांनी निर्माण केले आहे.

शाब्दिक बुडबुड्यांतून महाराष्ट्रातील शेती-शेतकरी, उद्योग, रोजगार, कामगार, सिंचन-पाणी-वीज-रस्ते-शिक्षण-आरोग्यसेवा याबाबत एका शब्दाचीदेखील चर्चा आज त्यातून ऐकू येत नाही. शेणात वळवळणाऱ्या विविध रंगी दुतोंडी अळ्यांची मोजदाद आणि वर्णने त्यांच्याकडून मिळणाऱ्या जाहिरातींच्या उत्पन्नाप्रमाणे करणे, इतकाच या बातम्यांचा खरा अर्थ आहे. निवडणुका या वैयक्तिक महत्वाकांक्षा आणि त्यानंतर दलालीचा धंदा करण्यासाठीचा एक उपक्रम आहे, असे किळसवाणे स्वरूप त्याला मुळात या प्रस्थापित राजकीय दलालांनी दिलेले आहे. त्यांच्याकडून मिळणाऱ्या पेड न्यूज आणि जाहिरातींच्या पैशांमुळे माध्यमांनी तोच ताल पुढे चालविला आहे.

शासनाची सत्ता म्हणजे एखादी सरंजामी दौलत असून, तिचा वारस किंवा वैयक्तिक जेता निवडण्यासाठी एक खेळ सुरू आहे; राजकीय नेते हे त्यातील मोहरे आहेत. हे आहे राजकीय प्रक्रियेचे माध्यमांतील या मंडळींचे आकलन! एका मराठी दूरचित्रवाहिनीवर तर, एकेका नेत्याच्या प्रदीर्घ मुलाखती घेताना, मागे एक बुद्धिबळाच्या पटाचे भव्य चित्र लावलेले असते. समोर प्रत्यक्ष किंग साईझ पट मांडून ठेवलेला असतो आणि मुलाखतीच्या अखेरीला त्या नेत्याला सांगितले जाते की, या पटावरील हत्ती, घोडा, उंट, वजीर, प्यादे इत्यादींपैकी आपण कोण आहात, त्याची निवड करा. आणि मग त्यातून त्या त्या मोहऱ्यांच्या रूपकाची चर्चा होते. राजकारण म्हणजे बुद्धिबळ आणि नेते म्हणजे मोहरे, ही आहे या माध्यमांची पातळी.

शिवसेना-भाजपा, काँग्रेस-राष्ट्रवादी आणि सर्वांतील जोकर म्हणता येईल असा मनसे यांच्यातील परस्परविरोधी, बेताल बडबडीची चर्चा करण्यामध्ये लेखणी व्यर्थ वाया घालविण्याची आमची इच्छा नाही. रिपब्लिकन पार्टी ही खरे तर मुळात कम्युनिस्टांची चळवळीतील नैसर्गिक-स्वाभाविक मित्र आणि सहकारी. पण त्यांनी महायुतीसमवेत जाण्याच्या घेतलेल्या आत्मघातकी निर्णयाची परिणती अखेर रिपब्लिकन पक्षात आणखी एक फूट होण्यात झाली. एक नेते रामदास आठवले भाजपाच्या केंद्रातील मंत्रीपदासाठी त्यांच्या समवेत गेले, तर अर्जुन डांगळे यांना शिवसेना हा त्यांचा नैसर्गिक साथी वाटू लागला. पुण्यातील त्यांचे प्रमुख नेते तर रिपब्लिकन पार्टीचे तिकीट मिळालेले असतानादेखील शिवसेनेच्या तिकीटावर उमेदवार झाले. हे सारे फक्त २४ तासांत घडले आणि हे सारे आंबेडकरी जनतेचे नाव घेऊन केले गेले, याचे सर्वात जास्त दु:ख व वेदना होत आहे.

एका अर्थाने विचार केला, तर या शिवसेना-भाजपा-काँग्रेस-राष्ट्रवादी-मनसे यांच्यात सहजपणे होणाऱ्या परस्पर देवाण घेवाणीचे कारणदेखील अतिशय स्पष्ट आहे. कारण त्यांचे आर्थिक-सामाजिक विषयांतील बहुतेक प्रश्नांवरील धोरणांबाबत जवळपास एकमतच आहे.

मुळात महाराष्ट्रातील करांचे उत्पन्न किती आहे? तर राज्याच्या सकल उत्पन्नाच्या ८ टक्के. ते किमान १२ टक्क्यांवर नेण्यासाठी करांचे दर न बदलता करवसूली नीटपणाने केली तरी काम भागण्यासारखे आहे. पण महाराष्ट्रात मूल्यवर्धित कर असो की, मुद्रांक कर, की करमणूक कर त्यामध्ये किती भ्रष्टाचार करून धनिकांकडून राज्य कसे लुटले जाते, या बाबत या ५

पक्षांनी कधी विचार केला आहे काय? तसे झाले तर या महाराष्ट्रातील कित्येक प्रश्नांमध्ये सरकारचा जो हस्तक्षेप आवश्यक आहे, तो करणे शक्य होईल. पण त्याबाबत ह्या ५ धनदांडग्यांच्या पक्षांकडे कोणताही विचार नाही. कारण ते या कर बुडव्यांचेच हस्तक आणि दलाल म्हणून राजकारण करत आहेत, हे आपण जाणतो.

आता म्हणूनच हे पहा. राज्यात वीजनिर्मिती वाढविण्याची फार मोठी गरज आहे. पण त्यासाठी त्यांना हवी आहे फक्त खासगी गुंतवणूक, ती देखील वाटेल त्या घातक अटींवर. वीजनिर्मिती क्षेत्रात महाराष्ट्र सरकारने मोठी गुंतवणूक करण्याची गरज आहे, हे यांपैकी कोणालाच मान्य नाही. विजेची चोरी-गळती बंद करण्याबाबत त्यांना काहीच करायचे नाही. एन्रॉन कंपनीला काँग्रेस (शरद पवार) यांनी आणले आणि भाजपा-शिवसेनेने प्रथम त्याविरोधात बोलत तिला तिप्पट मोठे करून महाराष्ट्राचे वीजक्षेत्र खड्ड्यात घातले हा इतिहास आहे. व्यावसायिक शिक्षणात खासगी संस्थांचा व्यापार सुरू झाला तो १९८३ मध्ये काँग्रेसचे वसंतदादा पाटील यांनी आणलेल्या धोरणामुळे. त्यावर आज प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सार्वजनिक शिक्षणाचा सर्व सरकारांनी नियोजित पद्धतीने कसा बोजवारा उडविला आणि त्याचवेळी शिक्षणाचा किळसवाणा बाजार सुरू केला, त्याचे भीषण परिणाम महाराष्ट्र अनुभवत आहे. पण हा बाजार असाच सुरू ठेवण्याबाबत या पाच पक्षांमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. रस्त्यांमध्ये सरकारने गुतवणूक करायची नाही आणि ते खासगी कंपन्यांना टोल तत्त्वावर चालवायला द्यायचे, हे धोरण आणले भाजपा-शिवसेनेच्या राज्यात. ते जनतेला लुटून वाटमारीच्या पद्धतीने छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने अंमलात आणले. त्याबाबत आंदोलन करणारी मनसे असो की, भाजप-सेना-काँग्रेस-राष्ट्रवादी यांचे हे धोरण बदलण्याबाबत काहीही वेगळे म्हणणे नाही.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सर्वात कमी मानधन देणारे राज्य महाराष्ट्र का? सर्व सार्वजनिक आरोग्याची धूळधाण करणाऱ्या राज्यात महाराष्ट्राचा क्रमांक फार वरचा कशामुळे? शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर कशामुळे? सिंचित क्षेत्राचे प्रमाण देशात सरासरीने ४२ टक्के असताना ते महाराष्ट्रात १८ टक्केच का? तामिळनाडू, केरळसारख्या राज्यात स्वत:चा निधी घालून जी सार्वजनिक वितरण व्यवस्था काम करू शकते, ते महाराष्ट्रात का नाही? महाराष्ट्रात दलितांवरील अत्याचारांचे प्रमाण इतके का वाढत चालले आहे? या प्रश्नांबाबत वरील ५ पक्षांकडे काहीही उत्तरे नाहीत. किंवा ते बदलण्यासाठी कार्यक्रम नाही.

कारण ते स्वत:च या प्रश्नाचा भाग आहेत. पर्यायी कार्यक्रम मांडून या पक्षांपासून या राज्याची सुटका करणे हेच या निवडणुकांतील डाव्यांसमोरील आव्हान आहे. आणि येत्या दोन आठवड्यांतील राजकीय वर्गसंघर्षात आपल्या हजारो कार्यकर्त्यांनी हे आव्हान निर्धाराने पेललेच पाहिजे. □□□

# मंगळाच्या कक्षेत यशस्वी प्रवेश!

पॉलिटब्युरो निवेदन

मंगलयान या उपग्रहाचा मंगळाच्या कक्षेतील प्रवेश ही एक वैशिष्टपूर्ण घटना आहे. अंतरिक्ष तंत्रज्ञानात भरताने साधलेली प्रगती यातूण दिसून येते. या यशाबद्दल भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पोलिट ब्युरो अभिनंदन करीत आहे.

भविष्यातील अंतराळ मोहीमंसाठी जीएसएलव्हीच्या उड्डाणावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे तर ही मोहीम पुढे जाऊ शकेल.

मंगळाच्या भ्रमण कक्षेतील प्रवेशाच्या यशस्वी मोहीमेमुळे भारतातील तंत्रज्ञानाच्या आवाक्यावर प्रकाश पडलेला आहे. ह्या आवाक्याचा आणखी विस्तार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवेत ज्याचा वापर देशाच्या इतर क्षेत्रातही करता येईल.

२४ सप्टेंबर २०१४

# संयुक्त लष्करी कारवाईच्या अमेरिकी दबावाला बळी पडू नका!

सिरिया आणि इस्लामिक स्टेट ऑफ इराक यांच्याविरोधातील अमेरिकेच्या नेतृत्वाखालील लष्करी युतीत भारताने सामील व्हावे यासाठी ओबामा प्रशासन भारतावर प्रचंड दबाव आणत आहे. भारताला आपल्या योजनेत सामील करून घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आत्ताच्या घडीला न्युयॉर्कमध्ये असल्याचा फायदा ओबामा प्रशासन घेण्याची शक्यता आहे.

भारत सरकारने कोणत्याही परिस्थितीत याला बळी पडता कामा नये. मानवतावादाचे संरक्षण अगर रानटी शक्तींचा विरोध वगैरे नावाखालील आक्रमणातही अमेरिकेबरोबर संयुक्तपणे सामील होता कामा नये.

आयएसआयएसच्या विरोधातील कोणत्याही आंतरराष्ट्रीय कारवाईला संयुक्त राष्ट्र संघाची संमती असायलाच हवी अन्यथा त्या कारवाईला काहीही कायदेशीरता असणार नाही.

भारताने आजपर्यंत ज्या भूमिकेचा पुरस्कार केला आहे व ज्या भूमिकेला संपूर्ण देशातून सर्वमान्यता आहे त्या मूलभूत भूमिकेपासून बाजूला न होण्याचा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्युरो मोदी सरकारला देत आहे.

३० सप्टेंबर २०१४

# चीनच्या अध्यक्षांचा भारत दौरा

सीताराम येचुरी

चीनचे अध्यक्ष आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस झी जिनपिंग (XiJinping) भारताच्या पहिल्या शासकीय दौऱ्यावर सपत्निक आले होते. हा दौरा तीन दिवसांचा होता. या दोन्ही पदांवर २०१२ मध्ये निवड झाल्यानंतर चीनच्या अध्यक्षांनी दिलेली ही पहिलीच भेट. या भेटी दरम्यान त्यांनी एकूण १६ सामंजस्य करारांवर सह्या केल्या. त्यापैकी ११ होते केंद्र सरकारबरोबर आणि ५ होते गुजरात व महाराष्ट्र सरकार यांच्याबरोबर.

या भेटीआधी केंद्र सरकारमध्ये सत्तारूढ होऊन शंभर दिवस होतात न होतात तोवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सार्कमधील नेपाळ या पूर्वाश्रमीच्या हिंदू देशाला, राजेशाही राजवट असलेल्या भूतानला आणि सुरुवातीला पुढे ढकलल्यानंतर जपानला भेट दिली होती. तसेच त्यांनी भारत भेटीवर आलेल्या ऑस्ट्रेलियाचे टोनी ॲबट आणि चिनच्या अध्यक्षांचे स्वागत केले होते. लवकरच ते युनोच्या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा, इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्यासह अनेक देशांच्या राष्ट्रप्रमुखांना भेटणार आहेत. अशा परिस्थितीत देशाच्या परराष्ट्र धोरणाची नेमकी दिशा काय असणार, हे कळायला काही काळ जावा लागणार आहे. असे असले तरी परराष्ट्र मंत्र्यांनी लोकसभेत निवेदन देऊन भारताच्या परराष्ट्र धोरणात सातत्य राखले जाऊन सरकारबरोबर तेही बदलणार नाही, याची ग्वाही दिली आहे. त्यामुळे याविषयी काही अभिप्राय आताच व्यक्त करणे योग्य होणार नाही.

तथापि, आधीच्या सरकारच्या कार्यकालात दहा वर्षे देश धोरण-लकव्यात अडकला होता, त्याला आपण त्यातून केवळ शंभर दिवसात मुक्त केल्याची गर्जना मोदींनी परदेशात - जपानला जाऊन केली होती. ही गर्जना ऐकून भारतीय भांडवलदारांनी आनंदाने टाळ्या पिटल्या होत्या. भारताला जगातील आण्विक एकाकीपणातून मनमोहन सिंगांनी बाहेर काढल्याबद्दल तितक्याच हर्षाने टाळ्या वाजवणारे हात हेच होते. तेच लोक आता मोदी देशाला तथाकथित लकव्यातून कधी बाहेर काढतात, हे आशाळभूतपणे पहात आहेत. पण मुळात मोदी हे मनमोहनसिंगांहून वेगळे काय करत आहेत ? परराष्ट्र धोरण असो वा देशांतर्गत नवउदार अर्थनीती, मोदी सरकार आणि मनमोहन सरकार यांच्यात काहीच फरक नाही.

मोदींच्या मागे टाळकरी म्हणून उभे असलेल्या लोकांत भारतीय प्रसारमाध्यमांचा एक विभाग उत्साहाने उभा आहे, यात काहीच आश्चर्य नाही. त्यांच्यात मोदींचे चीअर-लीडर म्हणून नाचण्यात जणू अहमिकताच लागली आहे. स्वत: पंतप्रधानांनी बॅगा भरायच्या आधीच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी न्यूयॉर्क आणि टाइम्स स्क्वेअरमध्ये जाऊन पोहोचले देखील आहेत.

ते काहीही असो. भारत-चीन दरम्यान विविध करार झाले आहेत. भारतीय यात्रेकरूंना कैलास मानसरोवराला जाण्यासाठी जास्त सोयीचा मार्ग खुला करण्याचे आश्वासन, अति वेगवान गाड्या चालवण्यासाठी रेल्वे क्षेत्रात वाढते सहकार्य, आर्थिक आणि व्यापारी संबंधात सातत्यपूर्ण, चिरस्थायी आणि संतुलित संबंध, परस्परांच्या बाजारपेठात दृक्-श्राव्य साधनांच्या व्यापारात परस्पर सहाय्य, सीमेवरील गुन्हेगारीला प्रतिबंध आणि अवकाश संशोधनात सहकार्य इ. करारांचा त्यात समावेश आहे.

नंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत भारताच्या पंतप्रधानांनी पुढील निवेदन केले:

'चीनसोबतच्या संबंधांना आम्ही खूप महत्त्व आणि प्राधान्य देतो. दोन्ही संस्कृती अत्यंत प्राचीन असून त्यांच्या सौहार्दपूर्ण परस्पर संबंधांचा इतिहास प्रदीर्घ आहे. चीन हा आपला सर्वात मोठा शेजारी असून माझ्या परराष्ट्रीय धोरणात आणि विकासाच्या योजनांत शेजारी देशांना महत्त्वाचे स्थान आहे. आपले दोन्ही देश लोकसंख्येने जगातील सर्वात मोठे देश असून वेगाने विकास होणाऱ्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अपूर्व वेगाने आणि व्याप्तीने दोन्ही देशांचा आर्थिक बदल होत आहे.

''त्यासाठी आपल्यात असलेल्या प्रचंड क्षमता प्रत्यक्षात याव्यात म्हणून परस्पर सहकार्य व विश्वास जोपासणारे, एकमेकांच्या संवेदना जाणून घेणारे, देशांच्या सीमांवर शांतता आणि सलोख्याचे वातावरण असणे अत्यावश्यक आहे.

आपण हे प्राप्त करू शकलो तर आपण परस्परांच्या आर्थिक वाढीला सहाय्यभूत होऊ शकू. आपल्या विभागात शांतता, स्थैर्य आणि समृद्धी निर्माण करू शकू. आणि जागतिक अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा आणि ऊर्जा देऊ शकू.

आपले विद्यमान आर्थिक संबंध आपल्या सुप्त क्षमतांना न्याय देत नाहीत, यावर आमचे दोघांचेही एकमत झाले. परस्पर व्यापारातील मंदी आणि बिघडत चाललेले संतुलन याविषयी मी या भेटीत चिंता व्यक्त केली. भारतीय कंपन्यांना चीनच्या बाजारात प्रवेश आणि गुंतवणुकीच्या संधी मिळाव्यात यासाठी चीनकडून मी भागीदारीची अपेक्षा केली. आमच्या चिंता ध्यानात घेण्याच्या दृष्टीने विचार केला जाईल असे आश्वासन अध्यक्ष झी यांनी दिले आहे.

आमची भागीदारी बळकट करण्यात दोन्ही देशांच्या जनतेमधील परस्पर संबंध, संस्कृती, पर्यटन आणि कला यांना मध्यवर्ती महत्त्व असल्याचे आमचे करार आणि संयुक्त निवेदने यांनी दाखवून दिले आहे.

नाथू-ला मार्गे कैलास मानसरोवरला जाणारा नवा मार्ग खुला करून दिल्याबद्दल मी भारतीय जनतेच्या वतीने अध्यक्ष झी यांचे आभार मानतो. या नव्या मार्गामुळे अनेक फायदे होणार आहेत. वाहनांतून कैलास मानसरोवरास जाता येणार असल्याने विशेषत: वृद्ध यात्रेकरूंची सोय होणार आहे. पावसाच्या दिवसात एक जास्त सुरक्षित पर्याय उपलब्ध होणार असून एकूण यात्रेचा कालावधी कमी होणार आहे आणि जास्त यात्रेकरूंना तेथे जाता येणार आहे.

'परस्पर सहकार्यावर जशी आम्ही चर्चा केली त्या प्रमाणेच प्रदीर्घ काल चालत आलेल्या मतभेदांचीही आम्ही खुल्या आणि मैत्रीच्या वातावरणात चर्चा केली.

'सीमेवर वारंवार घडणाऱ्या घटनांविषयी मी आम्हाला वाटत असलेली

गंभीर चिंता व्यक्त केली. सीमाप्रदेशातील शांतता आणि सौहार्द हा परस्पर विश्वास आणि नाते बळकट करायचा आधार आहे. यावर आमचे एकमत झाले. हा परस्परांना मान्य असलेला समज काळजीपूर्वक जोपासला पाहिजे. सीमांविषयी झालेले करार आणि परस्परांत सौहार्द निर्माण करायचे आम्ही आजवर केलेले उपाय चांगलेच फलदायी ठरलेले असले तरी शांतता कायम राहण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष ताबा रेषेविषयी स्पष्टता असली पाहिजे, अशी सूचना करून ती स्पष्ट करण्याची व थांबलेली बोलणी चालू ठेवण्याची मी अध्यक्ष झी यांना विनंती केली आहे. सीमाप्रश्न लवकर सुटावा म्हणून प्रयत्न व्हायला हवेत.'

चीनचे राष्ट्राध्यक्ष आणि भारताचे पंतप्रधान यांच्या वैयक्तिक निवेदनांखेरीज 'भारतीय आणि चीनच्या प्रजासत्ताकांनी १९ सप्टेंबर रोजी विकासासाठी जास्त घनिष्ट सहकार्य करण्याविषयी निवेदन' प्रसूत केले. इतर अनेक बाबींखेरीज परस्पर द्विपक्षीय सहकार्य, विवाद आणि प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय सहकार्याविषयी प्रयत्नांचे संयुक्त मूल्यमापन करण्याची रूपरेखाही सादर केली. या संयुक्त निवेदनात म्हटले आहे:

'दोन्ही देशांच्या नेत्यांनी अलिकडील काही वर्षांमध्ये भारत-चीन संबंधात झालेल्या प्रगतीचे सकारात्मक मूल्यमापन करून दोन्ही देशांचे नेतृत्व आपल्या संबंधाकडे आंतरराष्ट्रीय सामरिक परिप्रेक्ष्यात सतत पहात असल्याची नोंद घेतली. दोन्ही देशांनी मान्य केलेली तत्त्वे आणि एकमत याला बांधील असल्याचा दोघांनीही पुनरुच्चार करून शांतता आणि सुबत्ता यासाठी पंचशीलाच्या तत्त्वानुसार सामरिक आणि सहकारात्मक भागीदारी आणखी बळकट करण्याची ग्वाही दिली. आपण विकसित होणाऱ्या दोन बलाढ्य अर्थव्यवस्था असल्याने त्यांच्या विकासाची उद्दिष्टे परस्परात गुंतलेली आहेत आणि त्यामुळे आपण एकमेकांना मदत करतच वाढीचे लक्ष्य गाठायला हवे. आपल्या वाढीच्या प्रक्रिया परस्परावलंबी आहेत, हे ध्यानात घेऊन जास्त एकजुटीने विकासात भागीदारी करायचे त्यांनी ठरवले आहे. शांतता आणि सुबत्ता प्रस्थापित करण्यासाठी सामरिक भागीदारी हा आपल्या सहकार्याचा गाभा बनवण्यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाले. ही विकासाभिमुख भागीदारी केवळ दोन्ही देशांच्या सामायिक हिताचीच नाही तर हा विभाग आणि एकूण जगात स्थैर्य व सुबत्ता यावी, यासाठी आवश्यक आहे.

'राजनैतिक दळणवळण बळकट करणे, सामरिक नाते सखोल बनवणे आणि सर्व स्तरांवरील राजकीय संवाद व विचारविनियम वाढवणे यावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले. हे उद्दिष्ट ध्यानात घेऊन शासनप्रमुखांच्या वारंवार भेटी घडवून आणाव्यात यावरही त्यांच्यात सहमती झाली. बहुपक्षीय व्यासपीठांच्या निमित्ताने दोन्ही देशांचे नेते एकमेकांना शक्य तितक्या जास्त वेळा भेटत राहतील. अध्यक्ष झी जिनपिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लवकरच चीनला भेट देण्याचे निमंत्रण दिले. त्यांना त्याबद्दल धन्यवाद देऊन पंतप्रधान मोदींनी निमंत्रणाचा स्वीकार केला आणि लवकरच अशी भेट देता येईल, अशी अपेक्षा केली.

'प्रदीर्घ काळ चालत आलेले मतभेद शांततामय सहजीवनाच्या पाच तत्त्वांच्या आधारे सोडवण्यासाठी कृतीशील राहण्याचे आश्वासन दोन्ही नेत्यांनी परस्परांना दिले. हे मतभेद परस्पर सामंजस्याच्या आड येणार नाहीत, याची काळजी घेण्याचेही आश्वासन परस्परांना देण्यात आले. दोन्ही देशांची समान सुरक्षा, दोघांच्याही आकांक्षा आणि समस्यांविषयी संवेदनशीलता दाखवत शांतता आणि सुबत्तेसाठी व्यूहात्मक आणि सहकार्यात्मक भागीदारी चालू ठेवण्याचा दोन्ही बाजूंनी पुनरुच्चार केला.

'या भेटी दरम्यान दोन्ही बाजूंनी भारत-चीन सीमा प्रश्नावर आपापली मते व्यक्त केली आणि परस्परांना मान्य होईल अशी योग्य सोडवणूक करण्याविषयी बांधिलकीचा पुनरुच्चार केला. या प्रश्नावर एप्रिल २००५ मध्ये झालेल्या कराराचा उल्लेख करत सीमाप्रश्न लवकरात लवकर सोडवण्यावर दोघांचेही एकमत झाले. हा करार दोन्ही बाजूंचे हितसंबंध सांभाळण्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगत परस्परांचे सामरिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या आधारे पावले उचलली जातील, हे पुन्हा एकदा मांडण्यात आले. सीमाप्रश्नाची राजकीय सोडवणूक करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या 'विशेष प्रतिनिधी'च्या यंत्रणेचे महत्त्व आणि तिची उपयुक्तता पुन्हा अधोरेखित करण्यात आली.

'भारत-चीन सीमेवर शांतता राहणे ही दोन्ही देशांचे परस्पर संबंध वृद्धिंगत होत रहाण्याची पूर्वअट आहे, हे दोन्ही बाजूंनी मान्य केले. सीमाप्रश्न अंतिमत: सुटेपर्यंत सीमाप्रदेशात शांतता नांदेल असे प्रयत्न करत रहाण्याचा विश्वास दोन्ही देशांनी एकमेकांना दिला.

'२१वे शतक शांतता, सुरक्षितता, विकास आणि सहकार्याचे शतक म्हणून ओळखले जावे, यावर दोन्ही देशांचा विश्वास आहे. दोन विकसनशील देश म्हणून पर्यावरणातील बदल, जागतिक व्यापार संघटनेची दोहा चर्चा, ऊर्जा व अन्न सुरक्षा, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांमधील सुधारणा आणि जागतिक प्रशासन याबाबतीत भारत आणि चीन यांचे हितसंबंध समान आहेत हे ब्रिक्स, जी-२० आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर दोन्ही देश परस्परांना करत असलेल्या सहकार्यातून प्रतिबिंबित होते.

'बहुध्रुवीय जग, आणि आर्थिक जागतिकीकरण, सांस्कृतिक बहुविधता आणि माहिती क्रांती हे जागतिक कार्यक्रम पत्रिकेवरील प्राधान्याचे विषय आहेत. आंतरराष्ट्रीय संबंधांचे लोकशाहीकरण आणि जागतिक शांतता, सुरक्षा आणि विकासात युनोचे मध्यवर्ती महत्त्व बळकट करण्यासाठी दोन्ही देश संयुक्त प्रयत्न करतील.

'युनो जास्त परिणामकारक करण्यासाठी युनोची सर्वंकष सुधारणा, युनोच्या कामकाजात आणि प्रशासकीय संरचनेत विकसनशील देशांचा वाढता सहभाग यावर दोन्ही देशांत सहमती आहे. एक मोठा विकसनशील देश म्हणून भारताचे महत्त्व चीन जाणतो आणि भारताच्या युनो व सुरक्षा समितीत वाढती भूमिका करण्याच्या आकांक्षेचे समर्थन करतो.

'सर्व प्रकारच्या दहशतवादाला ठाम विरोध करण्याचा निर्धार दोन्ही बाजूंनी व्यक्त करू, त्याविषयी अजिबात सहनशीलता दाखवायची नाही, यावर एकमत झाले. दहशतवादाविरोधात दोन्ही बाजूंनी परस्परांना सहकार्य करण्याला दोन्ही देश बांधील आहेत. युनोचे सर्व ठराव, विशेषत: ठराव क्र.१२६७, १३७३, १५४० आणि १६२४ यांची अंमलबजावणी झाली पाहिजे, यावर दोन्ही देशांनी भर दिला.

'पर्यावरणातील बदल ही मानवजातीसमोरील चिंतेची समस्या असून २१व्या शतकातील ते जागतिक आव्हान असल्याचे दोन्ही देशांनी मान्य केले. चिरस्थायी विकास ध्यानात घेत आंतरराष्ट्रीय सहकार्य करून २१व्या शतकाचे आव्हान पेलण्याची गरज दोन्ही बाजूंनी मान्य केली. २०१५ मध्ये होणाऱ्या पर्यावरण बदलावरील युनोच्या संमेलनात संतुलित, न्याय्य आणि सर्वंकष असा बहुराष्ट्रीय करार व्हावा यासाठी दोन्ही देश प्रयत्नशील राहतील. प्रत्येक देशाने आपल्या क्षमतेनुसार पर्यावरण रक्षणाची वेगवेगळी जबाबदारी घेतली पाहिजे, या तत्त्वानुसार २०१५चा करार झाला पाहिजे यावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले.

*(पान ८ पहा)*

# अमेरिका आणि चीन यांच्यामधील वाढता तणाव

**योहानन चेमरापल्ली**

वॉशिंग्टन आणि बेजिंग यांचे परस्पर संबंध अलिकडच्या काही महिन्यांमध्ये क्रमश: बिघडत असल्याचे दिसून आले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या एप्रिल महिन्याच्या भेटीनंतर या प्रक्रियेला आणखी गती मिळाली. चीनच्या पूर्वेकडील समुद्रातील सेन्काकू/दिआओयु या वादग्रस्त बेटांवर आपला मालकी हक्क असल्याचा जपानने जो दावा केला, त्याला अमेरिकेचा राजकीय पाठिंबा असल्याचे बराक ओबामांनी ठामपणे पुन्हा एकदा या भेटीत नमूद केले. एवढेच नव्हे तर ओबामा असेही म्हणाले की, चीन आणि जपान यांच्यामध्ये या मुद्यावरून जर आपापसात वैर निर्माण झाले तर अमेरिकेचे दीर्घकालीक दोस्त राष्ट्र असलेल्या जपानचे समर्थन करण्यासाठी अमेरिका करारबद्ध राहील. ते पुढे म्हणाले होते, 'युनायटेड स्टेटसचे धोरण अगदी स्पष्ट आहे. सेन्काकु बेटसमूहांचे प्रशासन जपानकडे असल्यामुळे, जपान हा 'परस्पर सहकार्य आणि सुरक्षेचा 'अमेरिका-जपान करार'– या कराराच्या ५व्या कलमाखाली येतो'.

मनुष्यवस्ती जवळजवळ नसलेल्या या छोट्या बेटांवर १८९५ पासून आपली मालकी आहे असा जपानचा दावा आहे; तर चिनी लोक, ज्यांना 'दिआओयु' म्हणतात, अशा या 'सेन्काकु' बेटावर १८९५ च्या आधीपासून, ऐतिहासिकदृष्ट्या आपला हक्क आहे असे चीनचे म्हणणे आहे, भौगोलिक दृष्ट्यासुद्धा ही बेटे चीनच्या समुद्रकिनाऱ्याच्या जास्त जवळ आहेत. चीन सरकारने म्हटले आहे की ही बेटे पुन्हा मिळविणे आमच्या देशाचे 'अग्रक्रमाचे राष्ट्रीय धोरण' आहे. सेन्काकु बेटांवरील जपानच्या सार्वभौमत्वाला अमेरिकन राष्ट्रपतींनी जो पाठिंबा दर्शविला , त्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना चीन सरकारच्या परराष्ट्रमंत्र्याने पुढील विधान प्रसृत केले, 'अमेरिका आणि जपान यांच्यामधील तथाकथित सुरक्षा करार हा दोन्ही पक्षांतर्फे शीतयुद्धाच्या दरम्यान करण्यात आलेली व्यवस्था होती. त्याचा वापर आता चीनच्या अधिपत्याला आणि कायदेशीर हितसंबंधांना हानि पोहचविण्यासाठी करता कामा नये.'

वॉशिंग्टन, पूर्व आशियातील तणावग्रस्त परिस्थिती आणखी भडकविण्यासाठी, चीन आणि शेजारच्या राष्ट्रांतील प्रादेशिक तंट्यांचा फायदा उठवित आहे. ओबामा प्रशासनाने रशियाला देखील लक्ष्य केले आहे. या वर्षाच्या सुरुवातीला युक्रेनच्या राजवटीत बदल करण्याचा, ओबामा सरकारने पहिल्यांदा जो प्रयत्न केला होता, त्याच्या आधीपासून मॉस्को आणि वॉशिंग्टन यांच्या परस्पर सबंधांचा ऱ्हास सुरू झाला होता. २८ मे रोजी 'वेस्ट पॉईंट' या अमेरिकेच्या सर्वोत्तम लष्करप्रशिक्षण संस्थेमध्ये केलेल्या भाषणात ओबामा म्हणाले होते. 'चीन आणि रशियाकडून प्रादेशिक शांतता आणि सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता आहे.'

'चीनची आर्थिक उन्नती आणि लष्करी पोहोच पाहून चीनचे शेजारी चिंतित' झाल्याचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी स्पष्ट केले. चीन 'प्रादेशिक चढाई' करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले 'या हल्ल्यांचे आघात आमच्या दोस्त राष्ट्रांवर होतील आणि परिणामी आम्हाला आमचे सैन्य मैदानात उतरवावे लागेल.' 'अमेरिकेच्या 'अपवादात्मक असाधारणत्वा'बद्दल ओबामा पुन्हा आवर्जून बोलले. 'एक अत्यावश्यक आणि अनिवार्य' राष्ट्र असे अमेरिकेचे वर्णन करून ते म्हणाले 'अमेरिकेला तिसऱ्या जगातील राष्ट्रांमध्ये एकतर्फी हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. वास्तविकत: असे म्हणताना ओबामा, आधीचे राष्ट्राध्यक्ष 'बुश यांच्या सिद्धांताचाच' ('Bush doctrine')पुनरुच्चार करीत होते. या बुश सिद्धांताच्या आधारे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे धडधडीतपणे उल्लंघन करून अमेरिकेने इराक आणि अफगाणिस्तानवर आक्रमण केले होते. लिबियाच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करून तेथील राजवट उलथून पाडण्यामागे सुद्धा अमेरिकेचाच हात होता.

चीन, फिलीपाइन्स आणि व्हिएतनाम ही तिन्ही राष्ट्रे अशा एका परिस्थितीमध्ये अडकून पडली आहेत, ज्यात तडजोड होण्याची चिन्हे दिसत नाहीत. मे महिन्याच्या सुरुवातीला चीनने दक्षिणेकडील तेल बाहेर काढण्याचे यंत्र (Oilrig) उभे केले. तेव्हा त्या विरोधात व्हिएतनाममध्ये निषेध निदर्शने झाली. चीनची ही हालचाल अविचारी आणि असमर्थनीय असल्याचे ओबामानी लागलीच जाहीरपणे सांगितले. व्हिएतनाममध्ये निषेध निदर्शनांनी चिनी कंपन्यांची तोडफोड केली. काही जण प्राणास मुकले. या ठिकाणी काम करणाऱ्या आपल्या बांधवांना तेथून बाहेर काढण्यासाठी चीनने आपली नाविक गलबते पाठविली. फिलीफाइन्समध्येसुद्धा ठिकठिकाणी निषेधकृती झाल्या. वादग्रस्त 'पॅरॅसेल' बेटांत चीनने बांधलेल्या हवाई उतरणपट्टीला (Landing Strip) फिलीपाइन्सने आक्षेप घेतला आहे.

## प्रादेशिक तंटे

चीन आणि शेजारची राष्ट्रे यांच्यामध्ये कित्येक वर्षे खदखदत असलेले प्रादेशिक तंटे आता उफाळून आले आहेत, असे कारण देऊन अमेरिकेने या संपूर्ण परिसरात लष्कर तैनात करून चीनला घेरण्याच्या हालचाली चालू केल्या आहेत. ओबामांनी मात्र या कारस्थानी हालचालींना 'रिबॅलन्स टू द इस्ट' म्हणजे 'पूर्वेकडील बिघडलेले संतुलन पुनर्प्रस्थापित करण्याचा प्रयत्न' असे आकर्षक नाव दिले आहे! ओबामा सरकारला चीनच्या विरोधात जी आक्रमक धोरणे अंमलात आणायची आहेत, ती धोरणे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सिंगापूरला झालेल्या 'सुरक्षा परिषदेत' अमेरिकेचे रक्षा-सचिव हेगल यांनी अधिक स्पष्टपणे मांडली होती. चीनसहित शेजारच्या प्रदेशांचे अनेक रक्षा मंत्री व सुरक्षा अधिकारी या परिषदेला उपस्थित होते. हेगल यांनी 'वेस्ट पाईन्ट' येथील ओबामांच्या कुर्रेबाज विधानाची पुनरूक्ती केली. ओबामा म्हणाले होते. 'जागतिक मंचावर अमेरिकेचेच नेतृत्व हवे. आपण ते केले नाही तर कुणीही करणार नाही.' या प्रदेशांमध्ये अमेरिकेने सैनिकी फौजा, जहाजे, विमाने व इतर लष्करी साधनसामुग्री हलविली असल्याची माहिती हेगलनी दिली. जपानला नवी क्षेपणास्त्रे, दक्षिण कोरियाला अत्याधुनिक लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रे पुरविली जातील असे अमेरिकने गेल्या काही महिन्यांत कबूल केल्याचे त्यांनी सांगितले, त्याचबरोबर ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व भारत यांच्याबरोबरचे रक्षा-सहकार्य अमेरिका आणखी विस्तृत करेल, आणि २०२० पर्यंत अमेरिकेची ६० टक्के हवाई आणि नाविक सामुग्री 'आशिया-पॅसिफिकमध्ये ठेवली जाईल, असेही हेगल म्हणाले.

फिलीपाईन्सने पुन्हा एकदा अमेरिकेच्या सैन्यासाठी लष्करी तळ उपलब्ध करून देण्याचे कबूल केले आहे. १९९०च्या सुरुवातीला जनतेने विरोध दर्शविल्यामुळे अमेरिकेला आपले दोन लष्करी तळ खाली करावे लागले होते. अलिकडेच मनीला आणि वॉशिंग्टन यांच्यामध्ये झालेल्या एका रक्षा-सहकार्य करारानुसार (EDCA-Enhanced Defence Cooperation Agreement) अमेरिकेच्या सैन्याला फिलीपाइन्सचा मुलूख वापरण्याचा अमर्यादित अधिकार प्रधान करण्यात आला आहे. जपानची शांततावादी, युद्धविरोधी राज्यघटना रद्द करून तिच्या जागी युद्धप्रिय, लष्करी धोरण जपणारी राज्यघटना आणण्याचे, पंतप्रधान शिन्झो अवे यांचे जे प्रयत्न चालू आहेत. त्यांना ओबामा सरकारचा पाठिंबा आहे. सिंगापूरच्या 'सुरक्षा परिषदेला संबोधित करताना आपल्या बीजभाषणात शिन्झो अवे म्हणाले होते की, चीनबरोबर चालू असलेल्या व्हिएतनाम आणि फिलीपाइन्स यांच्या भांडणात जपान, व्हिएतनाम-फिलीपाइन्सच्या बाजूने आहे. चीनशी तंटा असलेल्या फिलिपाइन्स, व्हिएतनामसहित इतर राष्ट्रांना जपान लष्करी सहाय्य करीत आहे.

## अमेरिकेच्या डावपेचांचे उद्दिष्ट

चीनला लक्ष्य करण्याचा पुन्हा एकदा अमेरिकेचा इरादा पक्का असल्याचे स्पष्ट संकेत, हेगल यांनी आपल्या सिंगापूरच्या भाषणात दिले होते. राष्ट्रांनी जर नौकापर्यटनावर मर्यादा घातल्या किंवा आंतरराष्ट्रीय नियमांकडे आणि प्रमाणांकडे दुर्लक्ष केले तर अमेरिका त्याकडे कानाडोळा करणार नाही अशी ताकीद त्यांनी दिली आहे. अमेरिकेच्या माजी राज्यसचिव हिलरी क्लीन्टन (२०१०च्या आसियान परिषदेत) म्हणाल्या होत्या की, चीनच्या दक्षिणी समुद्रात नौकापर्यटनाचे स्वातंत्र्य मिळणे हे वॉशिंग्टनसाठी राजकीयदृष्ट्या महत्वाचे आहे. 'दक्षिण-पूर्व आशियातील ज्या समुद्रमार्गावरून चीनसाठी कच्च्या मालाची आणि ऊर्जेची नियमितपणे आयात होते, त्या मार्गांवर आपला ताबा प्रस्थापित करणे हे अमेरिकेच्या डावपेचांचे उद्दिष्ट आहे. चीनच्या पूर्वेकडील समुद्रातील ज्या वादग्रस्त सेन्काकु बेटांवर चीनने आपला हक्क असल्याचे म्हटले आहे, तो विभाग 'हवाई संरक्षण क्षेत्र' असल्याचे जेव्हा चीनने जाहीर केले तेव्हा वॉशिंग्टन आणि टोकीयोनी प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. चीनच्या दक्षिणेकडील समुद्रपट्टीत काही प्रदेशांवर मालकी असल्याचा दावा चीनने केल्यामुळे तो विभाग अस्थिर झाल्याचे विधान हेगलनी कोणत्याही पुराव्याशिवाय केले आहे.

कम्प्युटरच्या सहाय्याने चीन, अमेरिकेच्या विरोधात हेरगिरी करीत असल्याचा दोषारोपसुद्धा ओबामांनी केला आहे. या पूर्वी मे महिन्यामध्ये वॉशिंग्टनने, अमेरिकन कंपन्यांच्या उद्योगांचा गुप्त तपशील चोरी केल्याचा आळ 'पीएल्ए'च्या (पिपल्स लिबरेशन आर्मीच्या) पांच अधिकाऱ्यांवर घेतला होता. त्यावर आपली तिखट प्रतिक्रिया व्यक्त करताना बेजिंगने म्हटले होते, खुद्द अमेरिकेचे सरकार अनैतिक अशा सायबर हेरगिरीमध्ये गुंतलेले आहे व चीन त्यांचे मुख्य लक्ष्य आहे. जागतिक पातळीवर अमेरिका हेरगिरी करीत असल्याचे तसेच कम्पुटरवरील संग्रहीत माहितीची चोरी करीत असल्याचे एडवर्ड स्वीडन यांनी पुराव्यानिशी उघडकीस आणले आहे.

बेजिंगमधील एका रिसर्च सेंटर (China Internet Media Research Centre)च्या अहवालानुसार, अमेरिका स्वत:च्या राजकीय, लष्करी, आर्थिक आणि औद्योगिक वर्चस्वाचा फायदा घेऊन, इतर देशांवर, एवढेच नव्हे तर स्वत:च्या दोस्त राष्ट्रांवरसुद्धा बारीक देखरेख ठेवते हे देखील सिद्ध झाले आहे.

वॉशिंग्टन आणि त्यांच्या दोस्त राष्ट्रांच्या हल्लेखोर वृत्तीचा मुकाबला करण्यासाठी चीन देखील ठोस पाऊले उचलीत आहे. चीन आणि रशिया या दोन्ही राष्ट्रांवर ओबामा सरकारने एकाच वेळी दबाव आणल्यामुळे, दोन्ही राष्ट्रांनी अत्यंत महत्त्वपूर्ण अशा परराष्ट्र धोरणासंबंधीच्या प्रश्नावर संयुक्त आघाडी उभी केली असून लष्करी आणि आर्थिक प्रश्नांवर दोन्ही राष्ट्रे परस्परांना सहकार्य करीत आहेत. रशियाकडून गॅस पुरवठा होण्यासाठी, मॉस्को आणि बेजिंग या उभयतांनी केलेल्या ४०० बिलीयन डॉलर्सच्या महाकरारामुळे भांडवली देशांच्या पायाखालची जमीन सरकली. भांडवली देशांकडून लादल्या जाणाऱ्या दंडात्मक प्रतिबंधाचे (Sanctions) आघात आता रशियाच्या अर्थव्यवस्थेला सोसावे लागणार नाहीत. गॅससाठी चीन हा रशियाची खात्रीची बाजारपेठ होईल व ऊर्जेचा पुरवठा पोहचविण्यासाठी चीनला समुद्रमार्गावर अवलंबून रहावे लागणार नाही.

युक्रेनचे आर्थिक संकट तसेच अधिक आर्थिक प्रतिबंधाच्या धोक्यामुळे रशियन राष्ट्राध्यक्ष पुतीन बेजिंगबरोबर करार करण्यास उत्सुक होते.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

---

## (चीनच्या अध्यक्षांचा भारत दौरा... पान ६ वरून)

'प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या अनेक समस्यांवर दोन्ही बाजू एकत्रित करत असलेल्या वाढत्या प्रयत्नांविषयी दोन्ही देशांनी समाधान व्यक्त केले. अफगाणिस्तान, पश्चिम आशिया, आफ्रिका, मध्य आशिया आणि दहशतवादाविरोधातील परस्परांतील सल्ला मसलत अर्थपूर्ण होत असल्याची नोंद घेतली.

'जागतिक स्तरावर आशिया-पॅसिफिक विभागाला महत्त्वाचे स्थान आहे. या विभागात शांतता आणि स्थैर्य नांदणे, या प्रदेशाचा सामायिक विकास होणे, आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करत सुरक्षा आणि सहकार्याची चौकट उभारणे यावर दोन्ही देश सहमत आहेत. आशियातील बहुपक्षीय सहकार्यासाठी अस्तित्वात असलेल्या यंत्रणांना दोन्ही बाजू समर्थन देत राहतील. या विभागात कार्यरत असलेल्या सहकार्याची क्षेत्रे अजून विस्तारण्यावर दोन्ही देश सहमत आहेत.'

दोन्ही देशांची संयुक्त निवेदने आणि त्यातील विधानांत अनुस्युत असलेली दृष्टी हा दोन्ही देशातील जास्त सौहार्दपूर्ण शेजारधर्माचा खंबीर पाया होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर परस्परांच्या हितासाठी करावयाच्या सहकार्याचा तो आधार आहे. भारत आणि चीन यांच्यातील सुधारलेले संबंध हे दक्षिण आशियातील, तसेच पर्यायाने आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील आणि त्यामुळे एकूणच जगातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक असल्याचे माकप नेहमीच मानत आला आहे.

भारताचे सार्वभौमत्व आणि यांच्याशी तडजोड न करता या दोन्ही महाप्रचंड देशांतील आर्थिक, सांस्कृतिक आणि जनतेचे परस्पर संबंध सुधारत असतानाच दोन्ही देशातील सीमाप्रश्नासहित सर्व प्रश्न सोडवले पाहिजेत. त्यातच दोन्ही देशांचे हित सामावलेले आहे. आपल्या परराष्ट्र मंत्र्यांनी लोकसभेत दिलेल्या आश्वासनानुसार भारताचे परराष्ट्र धोरण पूर्वीच्या 'सातत्याने' चालू ठेवण्यातच या प्रक्रियेची हमी आहे.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# भाववाढ का होते?

प्रभात पटनाईक

काही वर्षांपूर्वीची गोष्ट एकदा किराणा मालाच्या दुकानात गेलो असताना तेथील दरपत्रकावर सहज नजर गेली. आणि मला एक जबरदस्त धक्का बसला. त्यावर लिहिलेला रॉकेलचा दर वाचून. लिटरला चाळीस रुपयांच्या आसपास. हा दर मला काही पटेना. लहानपणी घासलेट विकत आणायला जात असे. पत्र्याचा डबा घेऊन. पाच लिटर घेतलं तरी एका रुपयातले काही पैसे परत येत असत. नंतरच्या काळात ते रेशनिंगमध्ये गेलं आणि आता कळलं की ते फ्री-सेलमध्ये चाळीस रुपयांना एक लिटर मिळतं. तो वेगळा जमाना होता. दूध विकलं जात असे, पण अजून त्याची पूर्ण क्रयवस्तू बनलेली नव्हती. घरी कोणी पाहुणा आला की शेजारून अर्धा पेला दूध आणलं जाई. ताक विकत नसत. आमच्या घरी ताक केलं की आई थोडं, थोडं शेजाऱ्यांना देण्यासाठी आम्हाला पिटाळायची. आता ताकाचं बटरमिल्क होऊन त्याचीही क्रयवस्तू बनली आहे. वस्तू वा पदार्थ क्रयवस्तू बनले की त्याला दर प्राप्त होतो. बाजारभावानुसार त्याचा दर हेलकावे खाऊ लागतो. कमी होण्यापेक्षा जास्त होत रहातो. आधी विनामूल्य, नंतर चार आणे लिटर मिळणारं दूध कालांतरानं पन्नास रुपयांवर जातं. सर्वच वस्तू-पदार्थांबाबत असं होतं. आज सकाळी वाचलं, तांदळापेक्षा वाळू महाग! निसर्गानं निर्माण केलेली गोष्टही क्रयवस्तू बनली आहे आणि तिचेही दर वाढत आहेत.

वस्तूचे भाव कमी न होता वाढत का रहातात? एखाद्या वस्तूची टंचाई निर्माण झाली की तिचा दर वाढतो, असा आपला सर्वसाधारण अनुभव असतो. जसे आता वाळूचे वाढले आहेत. मागणी-पुरवठ्यातील बदलत्या समीकरणाने ते कमीजास्त होतात. पण एक जरासा मोठा कालावधी घेतला की सर्वच वस्तूंचे दर वाढलेले दिसतात. याला जबाबदार कोण? सरकार! पण ते कसं जबाबदार आहे, हे नीट समजून घ्यायला हवं. त्याविषयीचे काही गैरसमजही दूर करायला हवेत.

देशातल्या एकूण भाववाढीला सरकारचं तुटीचं अंदाजपत्रक जबाबदार आहे, असं एक उत्तर देण्यात येतं. तुटीचं अंदाजपत्रक ही काहीतरी भयानक गोष्ट असल्याचा गहजब अर्थशास्त्रज्ञांपासून गावच्या वर्तमानपत्रांपर्यंत सर्वजण करू लागतात. सरकार लोकांचा अनुनय करण्यासाठी उधळपट्टी करतं, मनरेगासारख्या बिनकामाच्या योजनांवर विनाकारण खर्च करत रहातं, अशी तक्रार केली जाते. भाववाढ, चलनवाढ कमी करून, 'अर्थव्यवस्था रुळावर आणा' असा सल्ला हे सर्वजण सरकारला देऊ लागतात. त्यांच्या दृष्टीनं उधळपट्टी थांबवा, याचा अर्थ असतो या तथाकथित 'लोकांचा अनुनय करणाऱ्या योजना बासनात गुंडाळून टाका.

आपण वादाकरता हा युक्तिवाद थोडा वेळ मान्य करू. सरकार लोकांच्या हिताच्या योजना राबवण्याच्या नावाखाली उधळपट्टी करतं. गेल्या दहा वर्षातली केंद्र सरकारची अशी सर्वात मोठी योजना म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हक्क योजना 'नरेगा' या नरेगावर सरकार किती हिस्सा खर्च करतं? देशाच्या सकल घरेलू उत्पादनाच्या म्हणजे जीडीपीच्या फक्त ०.३ टक्के. नरेगासोबतच इतर सर्व योजनांचा खर्च एकत्र केला तर किती होतो? जीडीपीच्या इनमीन ०.५ टक्के. याहून जास्त रकमेच्या सवलती तर संपुआ सरकार कर सवलतीतून श्रीमंतांना देत आलं आहे. प्रत्येक अंदाजपत्रकातून. त्यांना या करसवलती का? तर त्यांना गुंतवणूक करायची स्फूर्ती यावी, म्हणून. भांडवलाच्या अंगात एक जनावर असतं, असं कीन्स हा ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ म्हणत असे. हे जनावर जागं झालं की अर्थव्यवस्था दौडायला लागते. हे आळसावलेलं जनावर जागं करायचं असेल तर त्याला करसवलतीचं सलायन दरवर्षी दिलं पाहिजे असं मनमोहनसिंग म्हणत असत. म्हणून दहा वर्षे सलायनच्या बाटल्यावर बाटल्या चढवल्या. पण या जनावरानं डोळा उघडून पाहिलंदेखील नाही. समोर गाजर दिसलं तर गाढव धडपडत का असेना, चालतं तरी. पण गाजरावर गाजर फस्त करूनही हे भांडवलशाहीचं भारतीय गाढव उठायला काही तयार नाही. ते असो. मुद्दा काय? गाजर खाऊ घातलंय गाढवाला, भुकेल्या माणसाला नव्हे. अंदाजपत्रकातील या वाढत्या तुटीला कारण नरेगासारख्या लोक-कल्याणकाही योजना नव्हे तर सरकारनं बड्या भांडवलदारांना दिलेल्या या करसवलती आहेत.

पण मुळात अंदाजपत्रकातील तूट हीच भाववाढीला जबाबदार असते. हे खरं नाही. आधीच वाढलेल्या भावात ती थोडी भर घालते, पण भाववाढ सुरू करून देत नाही, की तिला जास्त चालना देत नाही. तुटीचं अंदाजपत्रक करून लोकांच्या हातात काही पैसा दिला जातो. त्यामुळे बाजारातील मागणीत काहीशी भर पडते. ही मागणी वाढल्यानं दरवाढीत थोडी भर पडते. याला ज्यादा मागणीमुळे वाढलेले दर असं म्हणता येईल. जादा मागणीमुळे होणाऱ्या दरवाढीचं स्वरूप कसं असतं? या सूत्रानुसार मागणी पुरी करतील इतक्या प्रमाणात त्या वस्तू आणि पदार्थ उपलब्ध नसतील तर त्यांचे दर वाढतात. पण भारतात तशी परिस्थिती नाही. लोकांच्या हातात जास्त पैसा आला की लोक जास्त धान्य खरेदी करू लागतील. ते धान्य कमी पडत असेल तर त्याचे दर वाढतील. आपल्या थोर देशात मात्र वेगळंच चित्र दिसतं. सरकारच्या ताब्यात धान्याच्या राशीच्या राशी सडत पडल्या आहेत. सरकार म्हणतं की, धान्य जास्त झाल्यानं गेल्या दोन वर्षात ४ कोटी टन धान्य निर्यात करण्यात आलं. तसेच, औद्योगिक क्षमता मोठ्या प्रमाणावर पडून आहे. सगळे कारखाने दिवसरात्र शंभर टक्के क्षमतेनं चालत आहेत, आणि तरीही लोकांची मागणी पुरी करता येत नाही. असं चित्र असेल तर भाववाढ होणं समजू शकतं. पण कारखाने गंजत पडलेत आणि वस्तू-पदार्थ बाजारात उपलब्धच नाहीत. एकूण जीडीपीची वाढ मंदावली आहे. कारखानदारीची वाढ तर पूर्णत: थांबली आहे आणि भाववाढ मात्र सातत्यानं होत आहे. तेव्हा भाववाढीसाठी तुटीच्या अंदाजपत्रकाला दूषण देणं, हे निव्वळ थोतांड आहे.

सध्याच्या भाववाढीला दुसरं एक स्पष्टीकरण दिलं जातं. आताच्या भाववाढीला 'वाढती मागणी' कारणीभूत नाही हे मान्य करून काही 'तज्ज्ञ वाढत्या उत्पादनखर्चाला कारणीभूत धरतात. भारतीय अर्थव्यवस्थेचे तटस्थ निरीक्षण करणारे हे किती तरी काळ सांगत आले आहेत. पण यातील बरेचसे 'तज्ज्ञ' एक मानभावी चूक करतात. नरेगामुळे ग्रामीण भागात वेतनावरील रकमेत वाढ झाली असून तेथे पैसा वाढला आहे, असा युक्तिवाद ते करतात. त्यात सरकारी तज्ज्ञांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

उदारमतवादी कालखंडात शेतमजुरांची परिस्थिती लक्षणीयरित्या सुधारली आहे असा दावा शेतीमालाचा उत्पादन खर्च आणि किंमतीविषयीच्या आयोगाने केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार १९९०-९१ ते २०००-

०१ या दहा वर्षात शेतमजुरांच्या वेतनवाढीचा दर हा वर्षाला ३.७ टक्के होता. २००१-०२ ते २०११-१२ च्या दहा वर्षांत तो थोडा खाली येऊन २.१ टक्के झाला, तरी वाढ होतच होती. २००१-०२ ते २००६-०७ च्या दरम्यान हा दर उणावला हे खरं. तो झाला होता दरसाल - १.८ टक्के. पण २००७-०८ ते २०११-१२ या पाच वर्षात त्यात एकदम ६.८ टक्के इतकी घसघशीत वाढ झाली. १९९०-२०१२ हा कालखंड घेतल्यास शेतमजुरीचा दर हा वर्षाला २.९ टक्क्यांनी वाढत होता.

शेतमजुरीतील ही वाढ नरेगामुळे झाली आहे असं शेतीमालाचा हा आयोग म्हणतो. त्याची सरकारच्या इतर अनेक खात्यांनी आणि संस्थांनी री ओढली आहे. या वाढत्या शेतमजुरीमुळे देशातील अन्नधान्याचे भाव वाढत आहेत, असा दावा ते करत आहेत. म्हणजे या भाववाढीला नरेगा जबाबदार आहे, असा त्यांचा दावा आहे. मजुरी वाढल्याने शेतीमालाचा उत्पादन खर्च वाढला आहे. हा वाढलेला खर्च भरून निघावा म्हणून सरकारनं अन्नधान्याची आधारभूत किंमत वाढवून दिल्याचं ते सांगतात. सरकारच्या आधारभूत किंमती नजरेत ठेवून खुल्या बाजारातील किंमती ठरत असल्यानं त्याचेही भाव वाढले आहेत, यातून ते एक निष्कर्ष काढतात भाववाढ रोखायची झाल्यास नरेगाला मर्यादा घातली पाहिजे.

नवउदार नीतीच्या भाटांच्या डोळ्यात वाढती शेतमजुरी खुपत आहे की काय, हे पहायला हवंच. परंतु, मुळात शेतमजुरांच्या 'खऱ्या' वेतनात वाढ झालेली आहे काय, हेच तपासायला पाहिजे. एक तर ही आकडेवारी किती विश्वासार्ह आहे, या विषयी शंका आहेत. हे आपण तूर्तास बाजूला ठेवू. कळीचा मुद्दा मजुरीचा दर हा नसून वर्षात एकूण किती कमाई झाली हा आहे. मजुरीचा दर आणि कामाचे एकूण दिवस यांच्या गुणाकारातून किती कमाई होते, हे समजतं. मुळात सरकारकडे शेतमजुरांना किती दिवस काम मिळतं, याची माहितीच उपलब्ध नाही. हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत शेतमजुरांची परिस्थिती वा उत्पादकांना करावा लागणारा खर्च याविषयी निश्चित असं काहीच सांगता येत नाही.

शिवाय शेतमजुरांचं खरं वेतन काढताना एक गफलत केली जाते. त्यासाठी शेतमजुरांसाठी असलेला ग्राहक किंमत निर्देशांक गृहित धरला जातो. प्रत्यक्ष जगताना या निर्देशांकाचा काहीच उपयोग होत नाही. नवउदार आर्थिक धोरणामुळे शिक्षण, आरोग्य या सेवांचं खाजगीकरण झालं आहे, शेतमजूर कुटुंबांचाही या सेवांवरील खर्च वाढला आहे. ग्राहक किंमत निर्देशांक अशा गोष्टी ध्यानात घेत नाही.

खासगीकरणाचा ग्राहक निर्देशांकावर काय परिणाम होतो हे पहाण्यासाठी एक उदाहरण घेऊ, आधी शेतमजूर आजारावरील उपचारासाठी सरकारी दवाखान्यात जात असे. आता सरकारनं डॉक्टर नाहीत, औषधं नाहीत, उपकरणं नाहीत अशा रितीनं ती सेवा विस्कळीत करून टाकल्यानं मजुराला खासगी डॉक्टरकडे वा हॉस्पिटलात जावं लागतं. या काळाच्या दरम्यान किंमती स्थिर राहिल्या तर भाववाढीचा दर शून्य असेल. पण मजुराला खासगी हॉस्पिटलमध्ये जावं लागतं. त्याचे दर भरमसाठ असतात. सरकारी हॉस्पिटलच्या दरात वाढ झाली नाही तर मजुराला त्याचा काहीच फायदा होत नाही. सरकारी उपचार मिळत असताना शेतमजुराला आजारपणावरील उपचारासाठी एकूण कमाईच्या ३० टक्के खर्च करावा लागत होता. आता खासगी हॉस्पिटलचे दर सरकारी दराच्या फक्त दुप्पट असले तरी शेतमजुरासाठी भाववाढीचा दर शून्य टक्के न रहाता १५ टक्के होतो. सरकारचा ग्राहक निर्देशांक आवश्यक सेवांचं मोठ्या प्रमाणावर होत असलेलं खासगीकरण लक्षातच घेत नाही. त्याचा दुहेरी परिणाम होतो. भाववाढीचा दर कमी मानला जातो आणि खऱ्या मजुरीची रक्कम फुगवून सांगितली जाते.

या ठिकाणी आंतरराष्ट्रीय श्रम काय म्हणते, हे ध्यानात घेतलं पाहिजे. त्याच्या अभ्यासानुसर २००८-१२ च्या दरम्यान भारतातील सर्वच श्रमिकांच्या वेतनात दरसाल १ टक्का घटच झाली आहे. तेव्हा शेतमजुरांच्या वेतनात वाढ झाली आहे. हा युक्तिवाद वस्तुस्थितीला धरून असणं शक्य नाही. शिवाय, देशातील शेतमजुरांची संख्या इतकी मोठी आहे की, त्यांचे वेतन वाढत असते तर त्याचा परिणाम एकूण श्रमिकांच्या सरासरी वेतनावर दिसून आलाच असता. म्हणजे एकाच वेळी शेतमजुरांच्या वेतनात वाढ आणि इतर मजुरांच्या वेतनात घट हे चित्र वस्तुस्थितीला धरून नाही.

या आकडेवारीच्या जंजाळातून सुटायचा एक सोपा मार्ग आहे. लोकांची परिस्थिती सुधारली की नाही. हे मोजायचं जगभरचं एक सर्वसामान्य मोजमाप आहे. प्रत्येकाला मिळणाऱ्या कॅलरीज. परिस्थिती सुधारली की जास्त कॅलरीज खाल्ल्या जातात. खरं तर भारतात 'माणूस रोज किती कॅलरीज खातो' यावरच दारिद्र्यरेषा ठरवली जाते. आता शेतमजुरांना किती कॅलरीज उपलब्ध होतात, याची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही, हे खरं. परंतु, ग्रामीण भागातली ही आकडेवारी उपलब्ध आहे. दररोज २४००हून कमी कॅलरीज मिळणाऱ्यांची १९७३-७४ साली ग्रामीण भागातील संख्या होती ७२ टक्के. पुढील दहा वर्षात यात सुधारणा होऊन १९८३ साली ती झाली ७० टक्के. ही परिस्थिती बिघडत १९९३-९४ मध्ये २४०० कॅलरीज न मिळणाऱ्यांची संख्या झाली ७४.५ टक्के, २००४-०५ मध्ये झाली ८७ टक्के आणि २००९-१० मध्ये तर तब्बल ९०.५ टक्के. याचा अर्थ १९७३ साली ग्रामीण भागात पौष्टिक अन्न खाणारे होते ३० टक्के. २०१० साली ते १० टक्के देखील राहिले नाहीत. केवळ शेतमजूरच आता पौष्टिक अन्न खात आहेत. असं म्हणणं दांभिकपणाचं नाही का ?

ग्रामीण गरिबांत प्रामुख्यानं शेतमजूरच आहेत. वरील आकडेवारीवरून त्यांच्या परिस्थितीत सुधारणा झाल्याचं दिसत नाही. उलट घसरणच झाली आहे. तेव्हा नरेगामुळे वाढलेली मजुरी हे काही आताच्या अन्नधान्याच्या भाववाढीचं कारण होऊ शकत नाही. उलट, जगण्याचा एकूण खर्च वाढत असल्यानं शेतमजुरांच्या मजुरीतून त्याची भरपाई झालेली नाही, होऊ शकत नाही.

हा जगण्याचा खर्च वाढला आहे. सर्व जीवनावश्यक सेवा खासगी करत आल्यानं. याचा फटका सर्व जनतेलाच बसला आहे. शेतमजूर काही या जनतेच्या बाहेर नाहीत. नरेगासारख्या कल्याणकारी योजना आताच्या भाववाढीला कारणीभूत नाहीत. उलट सतत होत असलेल्या भाववाढीला या योजनांतून मिळणारा आधारही गरिबांना आणि शेतमजुरांना पुरेसा पडत नाही. सरकारच्या अखत्यारीतील सेवा खासगी केल्या की जगायच्या खर्चात वाढ होत जातेच. याचं कारण यापूर्वी कष्ट करणाऱ्या जनतेसाठी दिलेली अनुदाने काढून घेतली आहेत, वरचेवर काढून घेतली जात आहेत. त्या सेवा आता खासगी नफ्यासाठी वापरल्या जात आहेत. आताच्या भाववाढीचं मूळ आहे जगण्याचा वाढता खर्च. कष्टकऱ्यांना मजुरी वाढवून घेतली तरी ती जगायचा खर्च भरून काढण्यासाठी पुरी पडत नाही. वस्तूंचे वाढते दर आणि वाढती मजुरी यांच्या स्पर्धेत मजुरी मागं पडते. आणि मजुरांच्या खिशातला पैसा कमी पडू लागला की भाववाढही कमी होऊ लागते. सरकार म्हणतं, भाववाढ रोखणं, हे आमचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी मजुरांच्या खिशात जाणारा पैसा थांबवला पाहिजे. त्यांची मजुरी वाढता कामा नये. लोक जास्त खाऊ लागलेत, असं शरद पवार म्हणाले होते ना ? उद्या म्हणतील, मजुरांनी कमीच खावं. तब्येत सांभाळण्यासाठी. मोदीही म्हणाले होते. आमच्या बायका डायटिंग करतात!

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# शारदा चिट फंड : डाव्या आघाडीला पराभूत करण्यासाठी मोठी रक्कम खर्च केली!

शारदा चिट फंड घोटाळ्याच्या चौकशीतून हे रहस्य उघडकीस आले आहे की, २०११च्या प. बंगाल विधानसभा निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसचा विजय निश्चित करण्यासाठी फसणवणुकीच्या या कारभारातून मोठी रक्कम खर्च केली गेली. माध्यमांच्या रिपोर्टमध्ये चौकशी समितीतील सूत्रधार आणि काही आरोपींच्या जबाबानुसार हे दर्शविण्यात आले आहे की, निडणुकांच्या अगोदर तृणमूल काँग्रेसला कमीत कमी १३० कोटी रु. देण्यात आले होते. हे देखील सांगण्यात आले आहे की, तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांना आपल्या निवडणूक प्रचारात खर्च करण्यासाठी या रकमेतील काही वाटा मिळाला होता.

२०११ची पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक डाव्या आघाडीच्या सरकारला पराभूत करण्यासाठी जीवन-मरणाच्या लढाईत बदलली होती. या निवडणुकांमध्ये डाव्या आघाडीविरोधी शक्ती व्यापक प्रमाणात एकत्र आल्या होत्या. राजकीय पक्ष व गटांशिवाय बुद्धिवाद्यांच्या एका गटानेही सीपीआय(एम) व डाव्या आघाडीच्या विरोधातल्या अभियानात भाग घेतला. या निवडणुकांमध्ये तथाकथित 'परिवर्तन'च्या शक्तींनी ज्या प्रकारे धनबळाचा वापर केला, तो अभूतपूर्व होता.

निवडणुकांच्या अगोदर सीपीआय(एम)ने हे सांगितले होते की, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी बेकायदेशीर पद्धतीने मोठ्या रक्कमेचे वितरण केले आहे. याबरोबरच पक्षाने हे ही सांगितले होते की, हा पैसा चिट फंडमधून येत आहे.

आता जेव्हा सीबीआय आणि दक्षता विभागाने राज्यातील आतापर्यंतच्या सगळ्यात मोठ्या आर्थिक घोटाळ्याचा तपास सुरू केला आहे, तेव्हा हे राजकीय संबंध स्पष्ट स्वरूपात समोर आले आहेत. आता ही बाब देखील समोर आली आहे की, करोडो रुपये रोखीने तृणमूल काँग्रेसच्या फंडात हस्तांतरीत केले गेले. तृणमूल काँग्रेस आणि शारदा ग्रुपमधले हे नाते तृणमूल काँग्रेस सत्तेवर आल्यानंतरही कायम राहिले किंवा त्यापेक्षा अधिक दृढ झाले. एसएफआयसो (सीरीयस फ्रॉड इन्वेस्टिगेशन ऑर्गनायझेशन)च्या चौकशी रिपोर्टचा उल्लेख करून माध्यमाच्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे की, हवालाच्या लेन-देनद्वारे शेकडो करोड रुपये परदेशी खात्यांमध्ये जमा करण्यात आले. या बेकादेशीर लेन-देनमध्ये खासदारांसह तृणमूलच्या अनेक नेत्यांनी सक्रिय भूमिका निभावली.

जवळपास २५,००० कोटी रुपये कदाचित यापेक्षाही जास्त रक्कमेच्या या अभूतपूर्व घोटाळ्याने फक्त पश्चिम बंगालमधीलच नाही तर इतर पूर्वोत्तर राज्यांमधील जवळपास २० लाख लोकांना आणखीन दारिद्र्यात ढकलून दिले आहे. या घोटाळ्याने २ वर्षांपूर्वी राज्याच्या संपूर्ण राजकीय-आर्थिक परिदृश्याला बदलून टाकले होते, जेव्हा शारदा ग्रुप ऑफ इंडस्ट्रिजच्या ठेवीदारांचे पैस परत न केल्यामुळे कंपनी बंद झाली होती.

प्राथमिक तपासातून हे निदर्शनास आले आहे की, हजारो करोडो रुपये दुसरीकडे गुंतविण्यासाठी आर्थिक लेन-देनच्या संबंधातून तृणमूल काँग्रेसबरोबर शारदा ग्रुप ऑफ कंपनीची सरळ सरळ राजकीय युती होती. सीबीआय चौकशीची मागणी जनतेने करूनही, सीबीआयकडे चौकशी सोपवण्यास राज्य सरकारने नकार दिला. म्हणूनच ज्या पद्धतीने राज्य शासनाची विशेष चौकशी समिती या प्रकरणाचा तपास करीत होती, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त केली आहे.

मे २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शारदा ग्रुप ऑफ कंपनीसह ४४ डिपॉजिट मोबिलाइजिंग कंपन्यांना सीबीआयकडे हस्तांतरीत केले. या सर्व अशा कंपन्या आहेत, ज्यांच्यावर संशय आहे की, त्या प. बंगाल, ओडिसा, आसाम, झारखंड व त्रिपुरात अशा फसव्या स्कीम्स चालवत होत्या.

आता जसजशी चौकशी पुढे जाते आहे तसा एकानंतर दुसरा तृणमूली नेता संकटात सापडत आहे. सीबीआयने तृणमूलचा वरिष्ठ नेता रजत मुजुमदार याला अटक केले आहे. तो माजी आइपीआय अधिकारी आहे आणि राज्याच्या सशस्त्र दलाच्या डी.जी. पदावरून निवृत्त झाला आहे. निवृत्त झाल्यावर तो शारदाचा सुरक्षा सल्लागार म्हणून काम करत होता आणि भरगच्च वेतन प्राप्त करत होता. फसव्या घोटाळ्यात अटक होणारा तो तृणमूल काँग्रेसचा पहिला नेता आहे. तृणमूल काँगेसचे राज्यसभा सदस्य सृंजन बसू यांनासुद्धा सीबीआयने विचारणा केली आहे.

वास्तवात आता ही संभावना दूर वाटत नाही की, मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचा दरवाजा लवकरच ठोठावला जाणार आहे. शारदा फसवणूक घोटाळ्यात त्यांचे नाव, त्यांची चित्रे खरेदी करण्यापासून तर रेल्वे मंत्रीच्या रुपात त्यांच्या कार्यकाळात आईआरसीटीसी-शारदा संयुक्त योजनेपर्यंत नियमित येत आहे. आता चौकशी इथपर्यंत पोहचली आहे की, शारदाबद्दल त्यांना काहीच माहिती नाही हा त्यांचा दावा कोणीच ऐकणार नाही. त्यांचे सरकार सुरुवातीपासूनच या घोटाळ्याची सीबीआय चौकशी करण्याच्या विरोधात होते.

आता सहजपणे त्यांच्या हेतूंना समजता येईल की, त्यांचे सरकार का सीबीआय चौकशीच्या विरोधात होते. पश्चिम बंगालच्या विरोधी पक्षांनी हा दावा केला आहे की, उत्तर बंगालमधील डेलोत शारदाच्या सीएमडींची स्वत: मुख्यमंत्र्यांबरोबर भेट झाली होती. जसजशी सीबीआय आणि दक्षता विभागाची चौकशी पुढे सरकत आहे, तसा हा दावा तथ्याच्या रूपात समोर येत आहे.

ज्या प्रकारे तृणमूल काँग्रेसच्या अनेक खासदारांना समन्स बजावण्यात आले आहेत आणि ज्या पद्धतीने ते तुरुंगात बंद आहेत. त्यानंतर शारदा फसवणूक घोटाळ्यात जोडल्या गेलेल्या तृणमूलच्या नेत्यांची यादी वाढतच चालली आहे. यात तृणमूल काँग्रेसचे महासचिव मुकूल राय आणि आणखी एक मोठे नेते मदन मित्रा यांचे देखील नांव आहे. अशात असेही होऊ शकते की, एक दिवस तृणमूलच्या 'सुप्रीमों'चे नाव असल्याचा मथळा बनेल.

परंतु आता तर हेच सांगता येईल की, 'प्रामाणिकपणाचे प्रतिक'च्या रूपातील त्यांच्या जाहीरातीचे मॉडेल उध्वस्त झाले आहे. प. बंगालची जनता आपल्या मुख्यमंत्र्याच्या 'शारदेचे प्रतिक'या रूपाला अगोदरच कंटाळली आहे. आता काळ व केंद्र सरकारच्या हेतूतूनच हे स्पष्ट होईल की, शारदा फसवणूक घोटाळ्यातल्या खऱ्या आरोपींना शिक्षा मिळेल की नाही ?

तृणमूल काँग्रेसच्या सरकारचा जन्मच फसवणुकीच्या पैशांच्या मदतीने झाला होता आणि कदाचित यासाठीच त्यांनी अशा लंपट पैशांकरता एक सुपीक जमीन तयार केली.

आता संपूर्ण राज्य या गोष्टीची वाट पहात आहे की, सीबीआय आणि न्यायालय केव्हा फसवणूक व भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या या ठगांना कठड्यात उभे करते. जोपर्यंत हे होत नाही, तोपर्यंत शारदा फसवणूक घोटाळ्यात ज्यांनी आपल्या जीवनातली सर्व कमाई गमावली, ते डाव्या आघाडीने आयोजित केलेल्या विरोध प्रदर्शनांमध्ये व मोर्चांमध्ये सहभागी होत राहतील व जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत या घोटाळ्यातल्या अग्रभागी असलेली फ्रॉड एजन्सी ज्याचे नाव 'तृणमूल काँग्रेस' आहे. तिला सतावत रहातील.

**(*'पीपल्स डेमॉक्रसी'वरून*) (अनुवाद : विजय पाटील)**

# कॉ. सखाराम देशमुख यांना श्रद्धांजली

लाल बावटा हॉटेल आणि बेकरी कामगार युनियनचे सक्रिय कार्यकर्ता कॉ. सखाराम देशमुख यांचे ३ सप्टेंबर रोजी मुंबईत आकस्मित निधन झाले.



विवंता बाय ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये कॉ. सखाराम देशमुख हे युनियन कमिटीचे १५ वर्षांपेक्षा जास्त काळ अध्यक्ष होते. या पंचतारांकीत हॉटेलचे कर्मचारी आणि कामगार १९७३ पासून सीटू संलग्न लाल बावटा हॉटेल आणि बेकरी कामगार युनियनमध्ये संघटीत आहेत. कॉ. देशमुख हे या युनियनचे उपाध्यक्षही होते. देशमुख यांच्या नेतृत्वाखालील युनियन कमिटीने वाटाघाटींद्वारे अनेक यशस्वी करार केले. त्यामुळे या हॉटेलमधील कर्मचारी आणि कामगारांना पगारवाढ आणि इतर फायदे तसेच अनेक सोयीसुविधाही मिळवून दिल्या. कॉ. देशमुख जरी कामगारांची बाजू मांडण्यासाठी झगडत होते तरी त्यांचे व्यवस्थापकांशी सुद्धा चांगले संबंध होते. ते एक नम्र, अनुभवी आणि मनमिळावू व्यक्ती होते. सीटूतर्फे मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमांत ते सतत भाग घेत असत.

त्यांच्या निधनानिमित्त ६ सप्टेंबर २०१४ रोजी हॉटेल व्यवस्थापन आणि युनियनच्या वतीने एक संयुक्त शोकसभा प्रेसिडेंट हॉटेलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेला हॉटेलमधील कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. हॉटेल व्यवस्थापनातर्फे अधिकारी व स्टाफ उपस्थित होते. तसेच मुंबईतील ताज हॉटेलच्या इतर ग्रुपचे एक्झीक्युटीव आणि युनियनचे नेते उपस्थित होते. या संयुक्त सभेला व्यवस्थापकांच्या वतीने हॉटेलचे मालक सर्वश्री राजेश नागपाल, चीफ कार्यकारी अधिकारी वीर विजय सिंग, जनरल मॅनेजर पंकज संपत, डायरेक्टर ह्युमेन रिलेशन्स संदीप बॅनर्जी, ह्युमेन रिलेशन्स मॅनेजर हेमंत शिंदे, ह्युमेन रिलेशन्स मॅनेजर श्रीमती आशा सुवर्णा, फ्रंट ऑफिस मॅनेजर श्रीमती रुची भटनागर, कॉर्पोरेट चेफ आनंदा सोलोमन, ह्युमेन रिलेशन्स मॅनेजर सुजु थॉमस यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. तसेच युनियनच्या वतीने सीटू महाराष्ट्र राज्य कमिटीचे सेक्रेटरी पी. आर. कृष्णन, युनियन कमिटीचे जनरल सेक्रेटरी शिवाजी मुसंडे, सीटू मुंबई कमिटीचे खजिनदार बापू कवर, हॉटेल कमिटी सदस्य विवेक निमसे आणि पांडूरंग नाईक यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. सभेत डोमनिक डिसोजा, परवेज खुमरी आणि प्रकाश कदम यांनीही श्रद्धांजली वाहिली.

यापूर्वी युनियन कमिटी मेंबर्स आणि युनियनचे नेते यांनी कॉ. देशमुख यांच्या मुलुंड येथील घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. कॉ. देशमुख यांच्या मागे त्यांची पत्नी उषादेवी, दोन मुलगे संदेश आणि मंगेश, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. कॉ. देशमुख हे सातारा जिल्ह्यातील, कराड तालुक्यातील हरपाळवाडी या गावचे होते. ते कराड तालुका व मुलुंड येथे रहात असलेल्या परिसरात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळीमध्ये सक्रिय होते.

**कॉ. सखाराम देशमुख को लाल सलाम!**

# इचलकरंजी : लाल बावट्याचा अन्न पुरवठा कार्यालयावर मोर्चा

शहरास अन्नसुरक्षा कायद्यामध्ये ७५ टक्क्यांचा निकष लावणे, प्रत्येक कार्डधारकांस पूर्वीप्रमाणे ३५ किलो धान्य देणे आणि रेशनकार्डावर १४ जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, या मागणीसाठी लाल बावटा रेशन ग्राहक संरक्षण समितीच्या वतीने इचलकरंजीच्या पुरवठा कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

दुपारी १ वाजता समितीच्या कार्यालयापासून मोर्चास सुरुवात झाली. समितीचे सदा मलाबादे, आबू मोमीन यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चाच्या वतीने पुरवठा अधिकारी के. बी. देसाई यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे, केंद्र सरकारने अन्नसुरक्षा कायद्यामध्ये लाभार्थ्यांसाठी ग्रामीण विभागासाठी ७५ टक्के, तर शहरी विभागासाठी ४५ टक्केवारीचा निकष लावला आहे. इचलकरंजीमध्ये १ फेब्रुवारीपासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. परंतु शहरी निकषामुळे शहरातील यंत्रमाग कामगार, घरेलू मोलकरीण, सायझिंग कामगार, आदी योजनांपासून वंचित राहिलेले आहेत. शहरात असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या अधिक आहे. सध्याच्या महागाईमध्ये कामगारांचे जगणे मुश्कील झाले आहे. त्यामुळे अन्नसुरक्षा योजनेमध्ये इचलकरंजी शहरास ७५ टक्क्यांचा निकष करून समितीकडे आलेल्या लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा यादीत समाविष्ट करा, रेशन कार्डावर साखर, तेल, डाळ आदी १४ जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली. या मागण्यांची पूर्तता झाल्यास न झाल्यास समितीच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

मोर्चामध्ये दत्ता माने, चंद्रकांत यादव, शिवगोंडा खोत, बाबू इस्माईल मुल्लाणी, साहेबराव मुल्ला, रामचंद्र, रेहाना शेख यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभगी झाले होते.

— दत्ता माने

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी**

**जीवनमार्ग - रु. ३००, लोकलहर - रु. २००, पीपल्स डेमॉक्रसी - रु. २५०, मार्क्सिस्ट - रु. १००**

# राजाराम ओझरे यांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून हकालपट्टी

*(दि. १ ऑक्टोबर २०१४ रोजी दिलेले वृत्तपत्र निवेदन)*

पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य आणि ठाणे-पालघर जिल्हा सचिव राजाराम नथू ओझरे यांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून ताबडतोब हकालपट्टी करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य सचिवमंडळाने पक्ष घटनेचे कलम १९ (१३) नुसार घेतला आहे.

२०१४च्या विधानसभा निवडणुकीसाठी डहाणू (अज) मतदारसंघातून पक्षाच्या जिल्हा व राज्य कमिटीने अनुक्रमे २२ ऑगस्ट आणि २६ ऑगस्ट रोजी कॉ. बारक्या वनशा मांगात यांची उमेदवारी एकमताने निश्चित केली होती. या दोन्ही बैठकींना राजाराम ओझरे स्वत: हजर होते आणि त्यांनी या प्रस्तावास मान्यता दिली होती. पक्षाचे विधानसभेचे उमेदवार म्हणून कॉ. बारक्या मांगात यांचे नाव खुद्द राजाराम ओझरे यांनीच सुचविले होते. मधुमेह आणि रक्तदाबाचा प्रदीर्घ त्रास असल्यामुळे ते स्वत: विधानसभेची निवडणूक लढविणार नाहीत असेही राजाराम ओझरे यांनी अनेकदा सांगितले होते.

असे असताना त्यांचा पुत्र सुधीर ओझरेने पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करून २४ सप्टेंबर रोजी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज भरला. त्यापूर्वी १४ सप्टेंबर रोजी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरणार असल्याचा नारळ सुधीर ओझरेने फोडला. या दोन्ही कार्यक्रमांना राजाराम ओझरे स्वत: हजर होते. सुधीर ओझरे हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा साधा सभासद देखील नाही. पक्षाच्या वा जनसंघटनांच्या एकाही आंदोलनात त्याने आजवर कधीही सहभाग केलेला नाही. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या आणि जमीन दलालीच्या अनेक गंभीर तक्रारीही पक्षाकडे आलेल्या आहेत. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध सुधीर ओझरेच्या उमेदवारीचे राजाराम ओझरे उघड समर्थन करीत आहेत, त्यासाठी धादांत खोटे बोलत आहेत ही अत्यंत गंभीर बाब आहे.

राजाराम ओझरे यांना पक्षशिस्त पाळण्याबाबत पक्षाच्या केंद्रीय व राज्य नेतृत्वाच्या वतीने समजावून सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न करण्यात आला. पण त्यांनी त्यास दाद दिली नाही. राजाराम ओझरे यांची वरील कृत्ये म्हणजे पक्षशिस्तीचा उघड उघड भंग व बंडखोरी आहे. त्यामुळे राजाराम ओझरे यांची पक्षातून तात्काळ हकालपट्टी करण्यात आली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कोणत्याही व्यक्तीपेक्षा केव्हाही जास्त श्रेष्ठ असतो, ही शिकवण कॉ. शामराव परुळेकर आणि कॉ. गोदावरी परुळेकर यांनी सातत्याने आम्हाला दिली होती. पक्षाची सर्वोच्च पदे तसेच आमदारकी व पंचायत समितीचे सभापतीपद अनेक दशके पक्षाच्याच जिवावर भोगल्यानंतर आता त्याच पक्षाशी गद्दारी आणि विश्वासघात राजाराम ओझरे यांनी केला आहे.

पण ठाणे-पालघर जिल्हे आणि विशेषत: तलासरी-डहाणू तालुके यातील प्रचंड बहुसंख्य पक्ष सभासद आणि जनता ठामपणे लाल बावट्याबरोबरच कायम आहे, ती जनता अशा गद्दार व विश्वासघातकी लोकांबरोबर कदापि जाणार नाही आणि आगामी विधानसभा निवडणुकीत विळा-हातोडा-तारा हीच निशाणी असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार कॉ. बारक्या मांगात यांना प्रचंड बहुमताने विजयी करेल, हा आम्हाला संपूर्ण विश्वास आहे.

**कॉ. डॉ. अशोक ढवळे**
**महाराष्ट्र राज्य सचिव व केंद्रीय कमिटी सदस्य, भाकप (मा)**

# लाडक्या खरपडे, जाना वरठा, शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे यांचीही पक्षातून हकालपट्टी

*(दि. ३ ऑक्टोबर २०१४ रोजी दिलेल्या वृत्तपत्र निवेदनाचा मुख्य भाग)*

पक्षाचे जिल्हा कमिटी सदस्य लाडक्या खरपडे व जाना वरठा आणि तलासरी तालुका कमिटी सदस्य शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे यांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून ताबडतोब हकालपट्टी करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ठाणे-पालघर जिल्हा सचिवमंडळाने पक्ष घटनेचे कलम १९ (१३) नुसार घेतला आहे.

२०१४च्या विधानसभा निवडणुकीसाठी डहाणू (अज) मतदारसंघातून पक्षाच्या जिल्हा व राज्य कमिटीने अनुक्रमे २२ ऑगस्ट आणि २६ ऑगस्ट रोजी कॉ. बारक्या वनशा मांगात यांची उमेदवारी आमदार राजाराम ओझरे यांच्या सूचनेवरूनच एकमताने निश्चित केली होती. असे असताना राजाराम ओझरे यांचा पुत्र आणि लाडक्या खरपडे यांचा जावई सुधीर ओझरेने पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करून २४ सप्टेंबर रोजी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज भरला. त्यापूर्वी १४ सप्टेंबर रोजी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरणार असल्याचा नारळ सुधीर ओझरेने फोडला. या दोन्ही कार्यक्रमांना लाडक्या खरपडे, जाना वरठा, शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे स्वत: हजर होते. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध सुधीर ओझरेच्या उमेदवारीचे लाडक्या खरपडे, जाना वरठा, शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे उघड समर्थन करीत आहेत, त्यासाठी धादांत खोटे बोलत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

सुधीर ओझरे हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा साधा सभासद देखील नाही. पक्षाच्या वा जनसंघटनांच्या एकाही आंदोलनात त्याने आजवर कधीही सहभाग केलेला नाही. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या आणि जमीन दलालीच्या अनेक गंभीर तक्रारीही पक्षाकडे आलेल्या आहेत. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध सुधीर ओझरेच्या उमेदवारीचे लाडक्या खरपडे, जाना वरठा, शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे उघड समर्थन करीत आहेत, त्यासाठी धादांत खोटे बोलत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

वरील पाच कार्यकर्त्यांना पक्षशिस्त पाळण्याबाबत पक्षाच्या राज्य व जिल्हा नेतृत्वाच्या वतीने समजावून सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न करण्यात आला. पण त्यांनी त्यास दाद दिली नाही. लाडक्या खरपडे, जाना वरठा, शंकर उंबरसाडा, लक्ष्मण बरफ व माह्या ओझरे यांची वरील कृत्ये म्हणजे पक्षशिस्तीचा उघड उघड भंग व बंडखोरी आहे. त्यामुळे त्यांची पक्षातून तात्काळ हकालपट्टी करण्यात आली आहे.

**कॉ. लहानू कोम**
**सदस्य, महाराष्ट्र राज्य कमिटी व ठाणे-पालघर जिल्हा सचिवमंडळ**
**माजी खासदार व माजी आमदार, भाकप(मा)**

# महाराष्ट्र लोकशाही समिती राज्यातील सर्व जागा लढवणार; सत्ता स्थापनेत निर्णायक भूमिका बजावणार!

*(दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी मुंबईतल्या पत्रकार परिषदेतील निवेदन)*

आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्ता लालसेने युती व आघाडीची शकले उडाली असताना डाव्या, पुरोगामी व रिपब्लिकन चळवळीतील घटक पक्षांची महाराष्ट्र लोकशाही समिती मात्र अभेद्य असून 'समिती'च्या वतीने राज्यातील सर्व जागांवर उमेदवार उभे करण्यात आले आहेत. समितीतील पक्ष हे जनतेच्या जीवन-मरणाच्या दैनंदिन व मूलभूत प्रश्नांवर सातत्याने लढणारे आहेत. समितीचे उमेदवार चळवळीतून तावून-सुलाखून निघालेले सक्षम व निष्ठेचे कार्यकर्ते आहेत. आज अनेक मतदारसंघांत किमान सप्तरंगी लढती असून काही ठिकाणी २५ ते ५० पर्यंत उमेदवारांचा आकडा पोहोचला आहे. अशा परिस्थितीत चळवळीच्या निष्ठेची व विचारांची कडवी मते हीच स्थिर राहणार असून या मतांमुळे अनेक मतदारसंघांत समितीचे उमेदवार निश्चित निवडून येतील, अशी स्थिती आहे. समितीच्या विजयी उमेदवारांचा आकडा महाराष्ट्रातील आगामी राजकारणात लोकाभिमुख वळण लावणारा ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

राजकीय रंगमंचावर जागा वाटपाचे नाट्य अखेरच्या क्षणापर्यंत रंगविल्यानंतर आधी शिवसेना-भाजप आणि पाठोपाठ काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांनी अनुक्रमे युती आणि आघाडीला सोडचिठ्ठी देऊन स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. जनतेच्या सेवेसाठी नव्हे तर तिच्या लुटीचा परवाना कुणी मिळवायचा याच्यासाठी चाललेल्या भांडणांची परिणती अखेर युती आणि आघाडी फुटण्यात झाली.

मात्र याच काळात राज्यातील डावे पक्ष, दलित चळवळीशी जोडलेले पक्ष आणि संघटना यांनी एकत्र येऊन जनतेला सक्षम पर्याय देण्याचे काम केले आहे.

एकीकडे सत्तेचा अधिकाधिक वाटा पदरात पडावा म्हणून उबग आणणारा जागावाटपाचा खेळ चालू असताना शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनता दल (से), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(से), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.), सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष यांचा सहभाग असलेली 'महाराष्ट्र डावी लोकशाही समिती', भारिप बहुजन महासंघ, दोन्ही लाल निशाण पक्ष व अन्य घटक पक्ष संघटना असलेली 'महाराष्ट्र लोकशाही आघाडी' आणि रिपब्लिकन सेना, शिवराज्य पक्ष, लोकशासन आंदोलन आदी पक्ष संघटनांचा समावेश असलेला संविधान मोर्चा यांनी एकत्र येत विधानसभा निवडणुकीत जनतेला 'समिती'च्या रूपाने सक्षम पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

महाराष्ट्र लोकशाही समितीच्या पर्यायाला जनतेने भरभरून प्रतिसाद द्यावा आणि केवळ सत्ता-संपत्ती संपादनासाठी धडपडणाऱ्यांना खड्यासारखे दूर ठेवावे, असे आवाहन आपल्याला करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| **प्रा. एस. व्ही. जाधव** | **डॉ. अशोक ढवळे** | **प्रताप होगाडे** |
| शेतकरी कामगार पक्ष | मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | जनता दल (सेक्युलर) |
| **आनंदराज आंबेडकर** | **प्रकाश रेड्डी** | **ब्रिगेडियर सुधीर सावंत** |
| रिपब्लिकन सेना | भारतीय कम्युनिस्ट पक्ष | शिवराज्य पक्ष |

# सातारा : वसतिगृहातील प्रश्नांबाबत एसएफआयचे आंदोलन

सातारा जिल्ह्यातील मलकापूर येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहातील विविध प्रश्नांना घेऊन एसएफआयच्या वतीने वसतिगृहाच्या प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. दूषित पाणी, निकृष्ट दर्जाचे जेवण, पुस्तके वेळेवर न मिळणे अशा समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत होते.

वसतिगृहातील बोअरवेलच्या पाण्यामुळे किडनीस्टोन, पोटदुखी, सर्दी, खोकला, घसादुखी, जुलाब इत्यादी आजारांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत होते व ह्या समस्या गेल्या चार वर्षांपासून जाणवत होत्या. बोअरवेल ही गटाराच्या शेजारी असल्यामुळे गटारातील पाणी त्यामध्ये जाऊन बोअरवेलचे पाणी दूषित झाले आहे. तसेच पाणी क्षारयुक्त असल्यामुळे मुलांना त्याचा त्रास होत आहे. नगरपंचायतीचे पाणी पिण्यासाठी मिळावे यासाठी वेळोवेळी तक्रार करूनही तेथील गृहपालांनी कोणत्याही प्रकारची व्यवस्था करून दिली नाही. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नगरपंचायतीचे उपसभापती विठ्ठल जाधव यांच्याशी चर्चा केल्यावर त्यांनी वसतिगृहाच्या आरोग्य तपासणीकरिता कर्मचारी पाठविले. त्या तपासणीत पाणी दूषित असल्याचे आढळून आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सभापती, उपसभापती, तहसिलदार यांना यासंबंधीचे निवेदन देण्यात आले.

वसतिगृहातील प्रश्नांबाबत गृहपालांना निवेदन देण्यास गेल्यानंतर ते उपस्थित नव्हते. त्याचा निषेध करून विद्यार्थ्यांनी तेथेच ठिय्या मांडला व गृहपालांना घेराव घालण्याचा इशारा दिल्यावर मलकापूरचे पोलीस अधिकारी बी. आर. पाटील यांनी गृहपालांना बोलावून चर्चा घडवून आणली. दोन दिवसांत सगळे प्रश्न सोडवले जातील असे आश्वासन यावेळी गृहपालांनी दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले.

किसान सभेचे नेते माणिक अवघडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या आंदोलनात चेतन शेळकंदे, नवनाथ मोरे, देविलाल बागुल, सुनिल झाडे, विरेंद्र पावरा, गजानन गव्हांडे, अमृत गवळी, कुंडलीक कोटरे, अमोल उगले, पंकज वाघिरे इत्यादी विद्यार्थी सामील झाले होते. **– चेतन शेळकंदे**